महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/ 472
दिनांक : २८/०१/२०२२ 28 JAN 2022

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय** : दि.३० जानेवारी, २०२२ रोजी "हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत..

**संदर्भ** : १. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक, जपती २०२२/प्र.क्र.१२/कार्या.२९ दि.२७.०१.२०२२

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकानुसार कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणर्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दि.३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही रविवार, दि. ३० जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता दोन मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून आदरांजली वाहण्यात यावी.

संदर्भिय शासन परिपत्रक सोबत जोडण्यात आले आहे पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित करणेत येत आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

दिनांक ३० जानेवारी, २०२२ रोजी सकाळी
११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून
हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २०२२/प्र.क्र.१२/कार्या.२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२२

वाचा :- केंद्र शासनाच्या गृह विभागाचे क्र.२/१/२०२२-Public, दिनांक १०.०१.२०२२ चे पत्र.

## परिपत्रक

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही रविवार, दिनांक ३० जानेवारी,२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. रविवार, दिनांक ३० जानेवारी, २०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/आस्थापना/शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०१२७१६२०४५३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL J TUMRAM

(सु. ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२. आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
१६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. पोलीस आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर/ठाणे /औरंगाबाद/ नवी मुंबई/सोलापूर/नाशिक
१८. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१९. जनरल ऑफीसर कमांडींग, महाराष्ट्र / गुजरात राज्य, मुंबई
२०. एअर ऑफीसर कमांडींग, मेरी टाईम्स एअर ऑपरेशन, महाराष्ट्र
२१. फ्लॅग ऑफीसर कमांडींग, इन चीफ वेस्टर्न कमांड, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई
२२. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे/ मध्य रेल्वे, मुंबई
२३. कमांडर जनरल होमगार्ड, मुंबई
२४. सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई
२५. कंट्रोलिंग ऑफिसर, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सांताक्रुझ विमानतळ, मुंबई
२६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
२७. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२८. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
२९. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
३०. संचालक, ऑल इंडिया रेडिओ, मुंबई
३१. संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-३२
**त्यांनी या परिपत्रकान्वये इशारा भोंगा वाजविण्याबाबत उचित कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.**
३२. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई
३३. डेप्युटी प्रिन्सिपॉल, इन्फॉर्मेशन ब्युरो, भारत सरकार, मुंबई
३४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
३६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई ( त्यांना विनंती की, या कार्यक्रमास दूरदर्शन, आकाशवाणी व वृत्तपत्रे इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी)
३७. निवड नस्ती (सामान्य प्रशासन विभाग / कार्यासन २९).